'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I– Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

# मराठी भाषा व साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा

डॉ. गजानन भास्करराव जाधव
प्राचार्य
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगाव राजा, जि. बुलडाणा - 443204
मोबा.: 9422724790

'संशोधन' हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. आज आपण अत्यंत प्रगत अशा जीवनाचा आस्वाद घेतो ते केवळ मानवाने जीवनातल्या सर्वच क्षेत्रातल्या तथ्यांचा 'शोध' घेतल्यामुळेच. "प्रश्न पडण्याची क्षमता आणि तसा तो पडल्यावर स्वत:ला उत्तर मिळेपर्यंत चैन न पडण्याची वृत्ती ही संशोधनाची पूर्व अट"[1] असली तरीही 'असे का' ह्या मानवी जातीला उपजतच सतावत असलेल्या प्रश्नातून मानवाला विश्वाचे रहस्य उकलत गेले. विज्ञान, समाजविज्ञान, भाषा, साहित्य अशा विविधांगी क्षेत्रातली उत्क्रांती ही मानवी बुध्दीला उपजतच निसर्गाने दिलेल्या व त्याला अस्वस्थ करणाऱ्या 'असे का' या प्रश्नानेच झालेली आहे. थोडक्यात त्या त्या क्षेत्रात अभ्यास करताना मानवी प्रवृत्तीला सतत पडत गेलेल्या 'प्रश्नांमुळेच' 'शोध' प्रक्रिया सर्वच क्षेत्रात गतिमान होत गेली आणि त्यातून मानवी जीवनाची संस्कृती विकसित होत गेली. संशोधनाच्या बाबतीत सार रूपाने सांगावयाचे झाल्यास सतत नाविन्याचा ध्यास घेऊन सारखे काहीतरी मांडत राहणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती अ ाहे. यातूनच 'संशोधना'सारखे शास्त्र विकसित होत गेले.

मराठी भाषा व साहित्याच्या संशोधन परंपरेचा विचार केल्यास अतिशय संपन्न आणि समृध्द अशी संशोधन परंपरा मराठीला लाभली आहे. मराठी भाषा व साहित्य यांचा वाङ्मयीन अंगाने, ऐतिहासिक पातळीवर, सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या उच्च दर्जाचे संशोधन करणाऱ्या विद्वानांची एक मोठी परंपरा मराठीला लाभलेली आहे. उदा. राजवाडे, खरे, सरदेसाई, भावे, पांगारकर, लक्ष्मणशास्त्री जोशी या प्रारंभीच्या पिढीतील संशोधकांनी अपार कष्ट घेऊन, मूळसंहितांच्या पाठचिकित्सा करुन मूलगामी संशोधनाची परंपरा मराठीत सुरु केली. यामध्ये इतर असंख्य विद्वानांचा समावेश आपल्याला करता येईल. स्वातंत्र्योत्तर कालखंडात विद्यापीठीय पातळीवर पदवीसाठी म्हणून केलेल्या संशोधनाचा दर्जाही निश्चितच ठोस असा आणि पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शक असा निर्माण करणाऱ्या विद्वानांमध्ये आपल्याला वि.भि. कोलते, तुळपुळे, मा.गो.देशमुख, वाटवे, पाठक, नांदापूरकर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. तसेच विद्यापीठीय पदवीचा हेतू न ठेवता ज्यांनी अव्वल दर्जाचे संशोधन कार्य केले अशा व्यासंगी संशोधकांमध्ये अ.का. प्रियोळकर, बनहट्टी, रा.श्री.जोग, वा.ल.कुलकर्णी, अ.ना. देशपांडे यांचा व इतर अशा असंख्य संशोधकांचा समावेश करता येईल की, ज्यांनी आत्यंतिक निष्ठेने व प्रामाणिकतेने मराठीमध्ये संशोधनाची उज्ज्वल परंपरा निर्माण केली.[2] प्रचंड कष्ट करण्याची समर्पित मानसिकता, व्यासंगी अभ्यासातून आलेली जाणती दृष्टी आणि सत्यान्वेशी ध्यास घेऊन या अगोदरच्या काळातल्या संशोधकांच्या पिढीनी मराठी भाषा व साहित्याच्या क्षेत्रात भरीव असे संशोधन केले. या मराठी मातीतल्या संशोधकांनी केलेले हे संशोधन कार्य प्रशंसनीय तर आहेच परंतु याच बरोबर असंख्य पाश्चात्य अभ्यासकांनी कसलाही स्वार्थ न ठेवता अत्यंत निष्ठापूर्वक असे मराठी भाषा व साहित्याच्या संदर्भात मूलगामी संशोधन केले. यामध्ये मोल्सवर्थ, झुल ब्लोक, वुईल्यम डॉडरेट, रेसाईड, आल्फ्रेड मास्टर, गुन्थर सोन्थायमर, फा.दलरी या व इतर असंख्य अमराठी अभ्यासकांचा उल्लेख करता येईल. शब्दकोश आणि व्याकरण हे कुठल्याही भाषेच्या अभ्यासाचे प्राणसूत्र असून तेथूनच भाषेचा खरा अभ्यास आणि संशोधन सुरु होते. यादृष्टीने विचार करता मराठी भाषेच्या

अभ्यासाचा खरा पाया मोल्सवर्थच्या इ.स. 1831 मध्ये प्रसिध्द झालेल्या 'मराठी - इंग्रजी शब्दकोशाने' रचला असे म्हणावे लागते. प्रा. झूल ब्लोक यांचा 'La Formation de la Langue Marathe' हा फ्रेंच भाषेतील ग्रंथ म्हणजे आधुनिक इंडो-आर्यन भाषांचा शास्त्रोक्त अभ्यासाचा पायाच असून तो मराठीच्याच नव्हे तर सर्व आधुनिक आर्यन-भारतीय भाषांच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आहे.[3] साधारणत: मराठीमध्ये झालेल्या संशोधनाचा आढावा घेतल्यास अत्यंत उच्च दर्जाचे संशोधन पूर्वसुरींचा विद्वान अभ्यासकांनी केलेले दिसून येते.

मराठी भाषा व साहित्याच्या संशोधनाला विद्वान अभ्यासकांनी घालून दिलेल्या तात्विक, प्रामाणिक आणि निष्ठापूर्वक समर्पित संशोधनाची परंपरा असतानाही हा संपन्न वारसा पुढे प्रामाणिकतेच्या अंगाने टिकवता आला नाही, असे खेदाने म्हणावे लागते. आज विद्यापीठीय पातळीवर एम.फील., पीएच.डी. च्या संदर्भाने होणाऱ्या संशोधनाचा दर्जा तपासल्यास तो अत्यंत सुमार असल्याचे कुणालाही जाणवेल. एकतर विद्यापीठीय शिक्षणात शिक्षकांना पीएच.डी. ही व्यायसायिक पात्रता केल्याने आणि या संशोधनाचा संबंध नोकरीशी, वेतनवाढीशी जोडल्याने साहजिकच त्या संशोधनाची मूल्यात्मकता संपून त्याला अत्यंत लाजिरवाने असे बाजारु स्वरुप प्राप्त झाले आहे. सहाव्या वेतन आयोगात विद्यापीठीय क्षेत्रातल्या शिक्षकांच्या सेवाअंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या बढतीसाठी संशोधन हा घटक महत्त्वाचा मानल्याने ह्या 'संशोधना'ला ओंगळवाने बाजारू स्वरूप येऊन या अत्यंत प्रगत अशा माहिती-तंत्रज्ञानाच्या काळात तर इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या भरमसाठ माहितीच्या आधारे नुसते 'कटींग पेस्टींग' करुन 'संशोधन' कार्य चालले आहे. संशोधनातल्या मूळ साधनांचा शोध, ग्रंथालयात तासनतास बसून मूळ संदर्भ ग्रंथांच्या आधाराने घेतलेला शोध ह्या गोष्टी आज CAS मुळे नक्कीच शुद्र ठरत आहेत. तर 'इंटरनेट' हेच आपल्या संशोधनाचे मुख्य स्त्रोत मानून केले जाणारे संशोधन मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे खऱ्या 'रिसर्च' पासून आजची पिढी दुरावत असल्याचे विदारक वास्तव समोर आले आहे. खरे म्हणजे या अधोगतीला केवळ सहाव्या वेतन आयोगातील तरतुदी कारणीभूत आहेत असे मानण्याचे काही कारण नाही. विद्यापीठीय पातळीवरच्या संशोधनाच्या संदर्भात साधारणत: तीसएक वर्षापूवी ख्यातनाम समीक्षक, अभ्यासक, डॉ. गो.मा. पवार यांनी काय म्हटले आहे ते पाहणे महत्त्वाचे ठरते. या विद्यापीठीय संशोधनाच्या संदर्भात ते म्हणतात.."काही ठराविक प्रकारचे विषय संशोधक अधिक प्रमाणात निवडताना दिसतात. एखाद्या लेखकाचा अभ्यास करणे हा संशोधकांचा आवडता विषय. निवड करण्याच्या दृष्टिने कदाचित सोपा असावा.... ह.ना. आपटे, ना.ह. आपटे, कोल्हटकर, पु.य. देशपांडे, फडके, खांडेकर, अत्रे, विभावरी शिरुरकर, शंकर पाटील यासारखे लेखक अभ्यास विषय म्हणून संपल्यानंतर बेताच्या वकूबाच्या लेखकापर्यंत येण्याची अभ्यासकाची तयारी असते. अनेकदा अशा लेखकांमध्ये अभ्यासनीय काही नसते. लक्षणीय निष्कर्ष निघण्याची शक्यता नसते. वाङ्मयाच्या इतिहासात दोन ओळींची नोंदही ज्यांच्या नावावर करता येणार नसते, असे लेखक संशोधनविषय म्हणून निवडले जातात याचे कारण अभ्यासाचा सोपेपणा. असला अभ्यास कोणत्या साच्याने करायचा ते ठरलेले असते"[4] ही तीसचाळीस वर्षापूर्वीची परिस्थिती आहे. आज या विद्यापीठीय पातळीवरच्या संशोधनाने अत्यंत भयावह अशी स्थिती निर्माण करुन ठेवली आहे.

उपरोक्त मराठी भाषा व साहित्यातील समृध्द, सशक्त संशोधन परंपरेचा आणि तद्नंतर खालावत जाणाऱ्या संशोधनाचा आपण थोडक्यात आढावा घेतला. आज संशोधनाच्या प्रामाणिकते बाबत विपरीत वास्तव जरी असले तरीही काही पातळीवर नक्कीच दर्जेदार संशोधन होत आहे, हे ही आपणास नाकारता येणार नाही. मराठी भाषा आणि साहित्याच्या संदर्भात जरी विपूल प्रमाणात संशोधन झालेले असले तरी अजूनही संशोधनातल्या असंख्या जागा, नव्या दिशा आपल्याला दाखवता येतात. त्या नव्या दिशा कोणत्या आहेत त्याचा आपण विचार करु. मराठी भाषेच्या संदर्भाने आज बरेच संशोधन उपलब्ध असले तरीही बदलत्या

ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

जीवनामानाचा, बदलत्या सांस्कृतिक-सामाजिक परिप्रेक्ष्याचा विचार केल्यास अजूनही मराठी भाषेच्या संदर्भात नव्या संशोधनाच्या दिशेचा शोध आपल्याला घेता येतो. मराठी भाषेच्या संदर्भात विचार केल्यास या भाषेचा लोकजीवनाशी अतुट असा सांधा आहे, तिला समृध्द अशी परंपरा आहे, तिला सुबोध अशी लिपी आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तिला साहित्याचा समृध्द असा वारसा आहे. असंख्य भाषिक आक्रमणांचा मुकाबला करुन तिने आपले स्वत्व आणि सत्व टिकविले आहे. असे असले तरीही आजच्या प्रचंड वेगाने पुढे सरकत चाललेल्या जागतिकीकरणात आपली भाषा आणि या भाषेने निर्माण केलेली भाषिक संस्कृती धोक्यात आली आहे. आजच्या अतिरेकी इंग्रजाळलेल्या शिक्षण पध्दतीमध्ये मराठी भाषेचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. तेव्हा या आक्रमणांना थोपवून कुठल्याही भाषेचे भय न बाळगता मराठी भाषेला अधिक समृध्द, अधिक अर्थवाही आणि अधिक आश्वासक कसे करता येईल हे आव्हान या क्षेत्रात संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधकांसमोर आहे. केवळ लोकभाषा म्हणून तिच्याकडे न पाहता आजच्या काळानुरुप मराठी भाषेला राजभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून कसे समर्थ करता येऊ शकते या दृष्टिने संशोधन करण्यास, सांगोपांग अभ्यास करण्यास अजूनही पुष्कळसा वाव आहे. या संदर्भात र.बा. मंचरकर म्हणतात की, "आपला समाज परावलंबी राहू नये, विज्ञान - तंत्रज्ञानापासून ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात नवनिर्मिती व्हावी अशी आपली आकांक्षा असेल तर मराठीची संस्कारित सरणी कशी वाढेल याचा आपण विचार केला पाहिजे. सर्वच क्षेत्रातील नवा विचार मराठीत करता आला पाहिजे. हे व्हावयाचे तर एक काटेकोर, निश्चित अर्थवाही आणि गुंतागुंतीच्या संकल्पना यथार्थपणे व्यक्त करणारी मराठी घडविता आली पाहिजे. तर मराठी नवविचारांची गंगोत्री बनेल. तिला ज्ञानभाषा म्हणून योग्य ती प्रतिष्ठा लाभेल."[5] यादृष्टीने विचार केल्यास भाषेच्या संदर्भातल्या पठडीबाज संशोधनाला फाटा देऊन मराठी भाषेसमोरील हे आव्हान दूर करण्याच्या संदर्भात संशोधकांना विपूल असा वाव आहे.

मराठी साहित्याला संत साहित्याचा संपन्न असा वारसा लाभलेला आहे. अशा या संपन्न संत साहित्यावर विपूल असे संशोधन झाले असले तरीही आजच्या आधुनिक काळाच्या अनुषंगाने संतसाहित्याचा अन्वयार्थ लावला गेला पाहिजे. असे झाले तरच आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या मायाजालात भरकटत चाललेल्या सांस्कृतिक अध:पतनाला आपल्याला थोपवून संतसाहित्यातील मौलिक सत्वाचे सार मराठी मनावर बिंबवता येईल. या संदर्भात रा.ग. जाधव यांनी व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे ठरतात. आधुनिकता आणि संत साहित्याचा अनुबंध जोडताना ते म्हणतात, "संत साहित्य आणि आधुनिकता या विषयाचा अर्थ अनेक प्रकारे केला जातो. एक म्हणजे आधुनिक काळात सांप्रदायिक दृष्टीने संतांचे कार्य व वाङ्मय कसे टिकून आहे, हे पाहणे. दुसरे म्हणजे आधुनिक काळातील (म्हणजे 19-20 व्या शतकातील) अभ्यासकांनी संत वाङ्मयाकडे कोणत्या दृष्टीने पाहिले आहे, ते लक्षात घेणे. तिसरे म्हणजे आधुनिक काळात कोणत्या अर्थाने संत वाङ्मय उपयुक्त किंवा अन्वर्थक ठरते, ते पाहणे. चवथे म्हणजे केवळ शुध्द वाङ्मयीन दृष्टीने संतवाङ्मयाचे गुणविशेष शोधून काढणे. थोडक्यात, आधुनिक जीवन कल्पना आणि वाङ्मयीन कल्पना यांच्या आधारे संत वाङ्मयाचा नव्याने शोध-बोध करुन घेणे."[6] संतसाहित्य हे महाराष्ट्राचे, मराठी मनाचे एक मौलिक स्वरूपाचे सांस्कृतिक धन आहे व ते टिकवायचे असेल तर या साहित्याचा आजच्या काळानुरुप सांस्कृतिक दृष्ट्या नवा अन्वयार्थ शोधण्याचे आव्हान संशोधकांसमोर आहे. मराठी साहित्याच्या संशोधनातील ही नवी दिशा समजून संशोधकांनी पुढे आले पाहिजे.

लोकसाहित्याच्या संशोधनाचा विचार केल्यास मराठीमध्ये विविध भागातून लोकसाहित्याच्या संकलनाचे आणि त्याच्या विश्लेषणाचे भरमसाठ काम झाले आहे. पुन्हा तेच ते संकलन करण्यापेक्षा आणि तिच ती मांडणी करण्यापेक्षा आज लोकसाहित्याची जवळपास खंडीत झालेली निर्मिती व तिचे जतन करण्याचे मोठे आव्हान अभ्यासकांसमोर आहे. हा सांस्कृतिक वारसा ग्रंथापेक्षा जनमानसात जिवंतपणे कसा टिकून राहिल हा ध्यास घेऊन या क्षेत्रात संशोधन करण्यास पुष्कळच वाव आहे, तसेच असंख्य आदिवासी

जाती-जमातींच्या आज अस्तगंत होत चाललेल्या बोलीभाषा कशा टिकवता येतील हा ही आपल्या समोरचा मोठा प्रश्न आहे. यादृष्टीने या क्षेत्रात संशोधन झाल्यास हे भाषिक संचित आपल्याला जतन करता येईल.

आजच्या आधुनिकीकरणाच्या कोलाहलात जगण्याचे एक आभासी चित्र निर्माण झाले आहे. आपण आधुनिकतेच्या, वैचारिक परिपक्वतेच्या प्रवाहात पूर्णतः सामील झालो आहोत या भ्रमात जगत आहोत. परंतु दुसरीकडे आजही जातीअंतची लढाई आपल्याला जिंकता आलेली नाही हे सत्य आहे. म्हणूनच जागतिकीकरणाच्या काळातले दलितपददलितांचे प्रश्न अधिकच गहिरे होत चालले आहेत. यामुळेच दलित साहित्याची पूर्वीची परिभाषाही आता बदलत चालली आहे. वंचितांचे साहित्य या जगण्याच्या नव्या काळडोहातून अवतरते आहे. त्याला या बदलत्या जीवघेण्या वास्तवातून स्वतःचा आक्रोश मांडावा लागतो आहे. दलित-पददलितांच्या क्रांतिकारी विचारांना भ्रष्ट करणाऱ्या या वास्तवाचा दलित साहित्यिकांना सामना करावा लागतो आहे. यासंदर्भात उत्तम कांबळे म्हणतात, 'सत्ताधारी व्यवस्था ज्या प्रमाणे आपल्या उत्पादनाचे तातडीने जागतिकीकरण करते, त्याच पध्दतीनं या व्यवस्थेच्या बळी ठरणाऱ्या, व्यवस्थेच्या पिळवणूकीचं साधन ठरणाऱ्या सर्वांनीच आपल्या प्रश्नांचसुध्दा जागतिकीकरण करायला पाहिजे. ते जर न करता तुम्ही गावातच, तंबूतच राहून बोलायला लागला तर मात्र कदाचित जागतिकीकरणाच्या लढाईत तुम्ही टिकू शकणार नाही. लढाई जिंकायची असेल तर आपल्या प्रश्नांचे, त्याच्यावरील उत्तरांचे, लढण्यासाठी वापरावयाच्या हत्याराचे, तत्त्वज्ञानाचे प्रामाणिकपणे जागतिकीकरण केले पाहिजे."[7] आजचे दलित साहित्य या नव्या आयामातून अवतरते आहे. म्हणूनच दलित साहित्याच्या मूल्यमापनाचे जुने निकष टाकून नव्या परिप्रेक्ष्यातून दलित साहित्याच्या संशोधनाच्या दिशा ठरवता येतील.असे झाले तरच दलित साहित्याच्या संशोधनातला तोचतोपणा जाऊन दलित साहित्याचे नवे मूल्यभान साहित्याच्या पटलावर येऊशकेल आणि तेव्हाच दलित साहित्याच्या अपरिहार्यतेच्या संदर्भाने कुचेष्टा करणाऱ्या द्वेष्ट्या प्रवृत्तीला संपविता येईल. ही दिशा डोक्यात ठेवून संशोधन केल्यास दलित साहित्याला नवे अस्तित्वभान प्राप्त होईल, यात शंका नाही.

नव्वदोत्तरी कवितेचा विचार केल्यास या कवितेतील आवेश-अभिनिवेश वाखाणण्याजोगा आहे. या कवितेने सामाजिक चळवळींची परखड चिकित्सा जशी केली तसेच कठोर आत्मपरीक्षणही केले. जागतिकीकरणाने निर्माण केलेले प्रश्न, बदलत जाणारी सांस्कृतिक मूल्यव्यवस्था, संज्ञापनाच्या क्षेत्रातील क्रांतिकारक बदल, भाषेचे तिरकसपण, भाषेची यांत्रिकता आणि मानव जातीपुढील नवी आव्हाने यांचे भान नव्वदोत्तरी कवितेने सशक्ततेने आधोरेखित केले. परंतु त्याच बरोबर नव्वदोत्तरी कवितेने असंख्य प्रश्नही निर्माण केले. तिच्या थिट्या होत जाणाऱ्या संवेदनशिलतेने आणि मागणीबरहुकूम कविता लिहिण्यामुळे आपली अस्सल मूळ कविताच हरवते की काय, हा गंभीर प्रश्न या कवितेने निर्माण केला. नव्वदोत्तरी कवितेच्या आकसत जाणाऱ्या या आविष्काराविषयी लिहिताना भा.ल. भोळे म्हणतात, "जगण्याशी कवितेला जोडण्याचे पथ्य पाळायला कवींनी शिकले पाहिजे. नकार किंवा विद्रोह या अंतरिम अवस्था असतात, प्रत्यक्ष जगण्यापेक्षा त्या मोठ्या असूच शकत नाहीत याचेही भान त्यांनी ठेवायला हवे. समकालीन मराठी कविता वाचतांना सतत असे जाणवते की, एकतर तिच्यावर काळाची प्रचंड दहशत आहे आणि दुसरे असे की तिच्या शब्दांची बव्हर्थता नष्ट होत चालली आहे. काळाचे भान अवश्य असावे पण अशी दहशत मात्र मुळीच कामाची नाही. भोवतालच्या घटितांपासून सुरु झालेला काव्यवस्तूचा प्रवास ती मानसिक विश्वात उतरुन सर्जनाच्या पातळीवर जाते तेव्हाच जर कवितेच्या स्वरूपात पूर्ण झाला तरच उत्तम कविता निर्माण होऊशकते"[8] नव्वदोत्तरी कवितेतून अस्तंगत होत जाणारे हे 'कवितापण' हा वर्तमान कवितेच्या संदर्भातला मोठा प्रश्न आहे. केवळ कवींची आणि संग्रहांची निव्वळ भलावन करणारे संशोधन आपण करत असू तर आजच्या कवितेने कवितेपुढेच निर्माण करुन ठेवलेले हे अनोखे प्रश्न अनुत्तरीतच राहतील. केवळ नव्वदोत्तरी कविताच नव्हे तर आजची कथा, कादंबरी, नाटक यांनी समकालाशी प्रामाणिक राहून निर्माण केलेले नवे सर्जन आणि त्यातून निर्माण झालेले असंख्य प्रश्न याकडे संशोधनाची दिशा

वळवल्यास नवे काहीतरी साहित्याला या शोधातून देता येईल.

उपरोल्लेखित केलेल्या चर्चेतून मराठी भाषा व साहित्याच्या संदर्भातल्या संशोधनाच्या दिशेने आजचे संशोधन झाल्यास हामखास मराठी संशोधनाचा दर्जा तर वृध्दिंगत होईलच सोबतच या संशोधनातून मराठी भाषा व साहित्याचा अवकाश रुंदावण्यासाठी नवी गती मिळेल. अन्यथा पठडीबाज संशोधनाचे ढिगच्या ढिग साचत जातील पण त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही, असे वाटते.

**संदर्भ सूची :**

1) मराठी वाड्मयकोश / खंड चौथा / समीक्षा-संज्ञा/संपादक : विजया राजाध्यक्ष / महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई/ प्रथमावृत्ती : 2002/ पृष्ठ : 373

2) पवार गो.मा. / भाषा व साहित्य : संशोधन / खंड दुसरा / संपादक : डॉ. वसंत जोशी, डॉ. गं.ना. जोगळेकर / महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे / प्रथमावृत्ती : 1985/ पृष्ठ : 316

3) तुळपुळे शं.गो./ भाषा व साहित्य : संशोधन / खंड दुसरा / संपादक : डॉ. वसंत जोशी, डॉ. गं.ना. जोगळेकर / महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे / प्रथमावृत्ती : 1985 / पृष्ठ : 316

4) उनि., पवार गो.मा. पृष्ठ : 317

5) मंचरकर र.बा./ हद्दपारीच्या वाटेवरील मराठी / संपादक : प्रभाकर बागले / अनुष्टुभ प्रतिष्ठान, मुंबई / पहिली आवृत्ती : 2002 / पृष्ठ : 27-28

6) जाधव रा.ग. / वाड्मयीन निबंधलेखन / कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे / तिसरी आवृत्ती : 1987 / पृष्ठ : 68

7) कांबळे उत्तम / जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न / सुगावा प्रकाशन, पुणे / पहिली आवृत्ती : 2002 / पृष्ठ : 23-24

8) भोळे भा.ल. / मराठी कविता : काही सुटलेले दुवे / ऐवजी, बुलडाणा / एप्रिल, 2006/ पृष्ठ : 10